**CNR No.MHLA-05-000125-2020**

विशेष दिवाणी दावा क्र.१०/२०२०
मधुमालती वि. पंढरी व इतर

## <u>आदेश नि.क्र.५ खाली</u>

वादी हिने सदरचा दावा हा शाश्वत मनाई हुकूमाकरीता, मालकी घोषीत करण्याकरीता व मावेजाची रक्कम मिळण्याकरीता सादर केला आहे. वादीच्या वकिलांचा वारंवार पुकारा केला असता ते हजर झाले नाहीत. वादी हिने तिच्या वादपत्रात असे कथन केले आहे की, ती वाद जमीनीची मालक व ताबेदार आहे. प्रतिवादी क्रं.१ ते ३ हे वादी हिच्या ताब्यास अडथळा निर्माण करीत आहेत. त्यामुळे वादी हिने प्रतिवादी क्रं.१ ते ३ यांच्या विरुध्द मनाई हुकूम मागीतला आहे. पुढे तिने तिच्या वादपत्रात असे कथन केले आहे की, प्रतिवादी क्रं.७ ने वादीचा अर्ज खारीज केल्यामुळे प्रतिवादी क्रं.१ ते ३ हे मावेजाची रक्कम उचलण्याच्या तयारीत आहेत. त्यामुळे प्रतिवादी क्रं.४ ते ७ यांनी मावेजाची रक्कम रुपये ८,२८,७१४/– ही प्रतिवादी क्रं.१ ते ३ यांच्या हक्कात हस्तांतरीत करु नये याबाबत मनाई हुकूम मागीतला आहे.

२. वादी हिच्या वादपत्राचे, तात्पुरत्या मनाई हुकूमाच्या अर्जाचे आणि दस्ताऐवजांचे अवलोकन केले. परंतु, प्रतिवादींना न ऐकता एकतर्फा अंतरिम मनाई हुकूमाचा आदेश पारीत केल्यास ते न्यायोचित होणार नाही. करीता, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

१. वादी हिच्या हक्कात तात्पुरता मनाई हुकूम का देण्यात येवू नये अशी कारणे दाखवा नोटीस प्रतिवादींना काढण्यात यावी.
२. प्रकरणाची नोटीस परतीची तारीख २२/०७/२०२० नेमण्यात येते.
३. वादी हिची मागणी असल्यास तातडीची प्रक्रीया शुल्क मंजुर करण्यात येते.

Digitally signed by Amol Ramchandra Surve
Date: 2020.07.10 17:55:32 +0530

दिनांकः१०/०७/२०२०

(अ.रा.सुर्वे)
दिवाणी न्यायाधीश व. स्तर,
अहमदपूर.